# S.P.M. Tatyasaheb Mahajan College of Arts and Commerce, Chikhli. District Buldana.

Session 2018-19

Department of Political Science

Survey report

# "Participation of women in Gram Sabha held under Gram Panchayat in Chikhli Taluka"

Survey Coordinator

Prof. Dr. Nagesh Khushalrao Gaikwad (M.A..M.Phil.,Ph.D..NET B.Ed)

Surveyor students

1. Pravin Kishore Jadhav 2. Mrs. Kalyani Ramesh Bhosle

3. Amol Subhash Lokhande 4. Ganesh Pandurang Mule

5. Mrs. Sanjeevani Ratan Kale 6. Prakash Ingle

7. Akash Prakash Salve 8. Dhiraj Rindhe

9. Mrs. Jayshree Gulabrao Solanki 10. Mrs. Madhuri Gajanan Akkar 11.Mrs. Shivani Ingle 12. Akash Dukre

13. Bhagwan Telangray 14. Sunil Kisan Jadhav

15. Mrs. Apoorva Vijay Jadhav 16. Mrs. Ankita Vijay Jadhav.

Participation of Women in Gram Sabha under Gram Panchayat in Chikhli Taluka - A Survey

**(January 2019)**

On behalf of the Department of Political Science, students should develop interest in research. And to be aware of survey methods used for research purposes. Also, the role of women in Panchayat Raj? This survey was conducted to find out. In this survey, 10 Gram Panchayats of Chikhali Taluka were identified and permission was sought from those Gram Panchayats to attend the Gram Sabha. With the kind permission, the students attended the Gram Sabha and observed the Gram Sabha. Also, survey questionnaires were filled by 10 women. officials After that Prof. Dr. Nagesh Gaikwad collected all those questionnaires and analyzed them. Accordingly, it was concluded that the active participation of women in Panchayat Raj is very less. (The students of our college should be interested in research and they should study the methods in the field of research.) With the aim of developing the attitude of researchers and physicians, we have discussed the issue of participation of women in the gram sabha under the gram panchayat of Chikhli taluka. A total of 16 students participated in it. Questionnaires were filled by the women who participated in the Gram Sabha. The 100 questionnaires received were tabulated and analyzed. Out of this, the participation of women in the Gram Sabha held under Gram Panchayat in Chikhli taluka is low and the participation rate of women officials is also low. Also, it has been pointed out that in many places the rights of women officials are being exercised through male relatives.

**(M.A..M.Phil.,Ph.D..NET B.Ed)**

**Gramsabha:Member filling the Questionnaire, at Amdapur Grampanchayt**





**Members of the local body filling the Questionnaire at their Homes**





**Members of the local body filling the Questionnaire at their Homes**





# शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली. जिल्हा - बुलडाणा.

## राज्यशास्त्र विभाग

*सर्वेक्षण अहवाल*

*सत्र २०१८ - १९*

*" चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग "*


**सर्वेक्षण समन्वयक**

**प्रा.डॉ. नागेश खुशालराव गायकवाड**

(M.A.,M.Phil.,Ph.D.,NET B.Ed)


## सर्वेक्षक विद्यार्थी

१. प्रविण किशोर जाधव
२. अमोल सुभाष लोखंडे
३. कु.कल्याणी रमेश भोसले
४. गणेश पांडूरंग मुळे
५. कु. संजीवनी रतन काळे
६. प्रकाश इंगळे
७. धिरज रिंढे
८. आकाश प्रकाश साळवे
९. कु. जयश्री गुलाबराव सोळंकी
१०.कु.माधुरी गजानन अक्कर
११.कु.शिवानी इंगळे
१२. भगवान तेलंग्रे
१३.आकाश डुकरे
१४. सुनिल किसन जाधव
१५. कु. अपुर्वा विजय जाधव
१६. कु.अंकिता विजय जाधव

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | घटक | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | प्रस्तावना | ग्रामसभा<br>ग्रामसभेचे कायदेविषयक स्थान<br>ग्रामसभेचे महत्व<br>ग्रामसभेत महिलांचा सहभाग | ०१ |
| ०२. | उद्दीष्ट्ये | | ०४ |
| ०३. | गृहितके | | ०४ |
| ०४. | सर्वेक्षणाचे महत्व | | ०५ |
| ०५. | तथ्य संकलन | | ०५ |
| ०६. | व्याप्ती व मर्यादा | | ०५ |
| ०७. | सर्वेक्षणाचे विश्लेषण | | ०५ ते ०९ |
| ०८. | निष्कर्ष व उपाययोजना | निष्कर्ष<br>उपाययोजना | ०९ ते १० |
| ०९. | सारांश | | १० |

**प्रस्तावना :-**

भारताने स्वातंत्र्योत्तर काळातील विकास कार्यात लोकसहभाग आणि लोकशाही विकेंद्रीकरण या दोघांचे महत्व योग्य प्रकारे उमजुन घेतले आणि त्याप्रमाणे केलेली कृती केली म्हणजे त्रिस्तरीय पंचायत राज्यव्यवस्था होय. १९५० च्या दशकात आफ्रिका आणि आशिया खंडातील अनेक देशामध्ये लिखीत संविधाने आणि लोकशाही शासनव्यवस्था असणाऱ्या राजवटी निर्माण झाल्या. परंतु १५-२० वर्षाच्या अल्प काळात अनेक आशियायी आणि आफ्रिकन देशामध्ये राज्यक्रांती होऊन लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या राजवटी कोसळून पडल्या आणि संविधाने निकालात निघाली. परंतु असे भारतात घडले नाही.अनेक आशियायी व आफ्रिकन देशाच्या तुलनेत भारतातील लोकशाही शासनव्यवस्था ही अधिक स्थिर असल्याचे दिसून येते.याचे रहस्य लोकशाही विकेंद्रीकरणातून निर्माण झालेल्या स्थानिक स्वशासनाच्या व्यवस्थेत दडलेले आहे असे अनेक विचारवंताचे म्हणने आहे.

भारत हा खेडयाचा देश आहे. पंचायत हा भारतीय खेडयांमधिल शासनव्यवस्थेचा कणा आहे.हे अनेक शतकाच्या इतिहासावरुन स्पष्ट होते. प्रत्येक भारतीय खेडे हे आत्मनिर्भर वा स्वंयपूर्ण असे गणराज्य व्हावे असे महात्मा गांधीचे स्वप्न होते.त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे इ.स.१९०९ पासून ग्रामस्वराज्य ही संकल्पना भारतीय जनमानसात रुजविण्याचे प्रयत्न केले. ग्रामिण समुदायासाठीच्या रचनात्मक कार्यक्रमात त्यांनी व्यसनमुक्ती,स्त्रीशिक्षण आणि प्रभावी व प्रवळ अशी स्त्री संघटना, जलस्त्रोतांचा शोध आणि समान जलवाटप पध्दतीची निर्मिती, जनसामान्यांना आरोग्यसेवेचा सुलभ उपलब्धता या सारखी सुत्रे प्रत्येक खेडयात राबविण्याचा आग्रह धरला. ते स्वत: स्थानिक स्वशासन संस्थाकडे स्थानिक स्वराज्य संस्था या दृष्टीनेच बघत होते. स्वराज्य हा शब्द गांधीवादी मुल्ये व आदर्श दर्शवितो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ग्रामिण समुदायाच्या पुर्नरचनेचा व विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. परंतु हा कार्यक्रम पुर्णत: गांधीवादी विचारसरणीवर आधारित नाही, तसेच गांधीवादी विचारसरणी पुर्णपणे फेटाळुनही लावली नाही वा अमान्य केली नाही हे वास्तव कोणीही नाकारु शकत नाही. त्रीस्तरीय पंचायत राज्यव्यवस्थेचा प्रारंभ हा महात्मा गांधीचे स्वप्न साकारण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. ग्रामीण समुदायाची पुर्नरचना करण्याच्या कार्यात ग्रामीण जनतेला सहभागी करुन घेण्याची ग्वाही पंचायत राज योजनेत दिलेली आहे. असेही म्हणता येईल. २४ एप्रिल १९९३ हा पंचायतराज राज्यव्यवस्थेच्या इतिहासातील अत्यंत महत्वपुर्ण दिवस ठरला कारण या दिवसापासून ७३ व्या घटना दुरुस्ती अन्वये त्रीस्तरीय पंचायत राज संस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.पंचायत राजव्यवस्थेतील ग्रामपंचायत आणि ग्रामसभा यांची रचना,अधिकार,कार्ये यांची ओळख होऊन त्यामध्ये निश्चितता आली.

**ग्रामसभा :-**

ग्रामसभा लोकशिक्षण, लोकनियंत्रण आणि लोकजागृती साध्य करण्यासाठी अतिशय उपयुक्त साधन आहे. प्राचिन साहित्यामध्ये ग्रामसभा असल्याचा उल्लेख येतो. वैदिक, मौर्य व चोल काळात, बुध्दकालीन जातक कथामध्ये, कौटील्यांच्या अर्थशास्त्रात इ.स.पुर्व तिसऱ्या शतकात असलेला ग्रिक प्रवासी मॅगेस्पेनिसच्या लिखाणात व मोगल काळात ही ग्रामसभा अस्तित्वात होत्या. गावाचा कारभार ग्रामसभेमार्फत चालत असे.त्यासाठी गावसभा घेत असत. सभेमध्ये एकमेकांच्या अडचणी सांगत आणि त्याचे निराकरण करण्यासाठी गावांचे पंच असत. लोकांशी चर्चा करणे,

अडचणी सोडविणे , गावाच्या विकासाला प्राधान्य देणे, महसूल जमा करणे, वादविवाद सोडविणे,गावांचे संरक्षण करणे, सार्वजनिक इमारती, विहिरी बांधणे, त्याची देखभाल करणे अशी कितीतरी लोकापयोगी काम करीत असत.वर्तमान काळाप्रमाणे ग्रामसभेचा अर्थ ग्रामपातळीवरील पंचायत क्षेत्रामध्ये अंतर्भुत असलेल्या एखाद्या गावांशी संबधित असलेल्या मतदार यादीत ज्यांची नांवे नोंदविण्यात आलेली असतील अशा व्यक्तींचा मिळून बनलेला समुदाय असा आहे.

ग्रामसभा हा ग्रामपंचायत या स्थानिक स्वंशासन संस्थेचाच एक भाग आहे. परंतु पंचायत राजव्यवस्थेत विशेषतः ७३ व्या घटनादुरुस्ती अंमलात आल्यापासून ग्रामसभेला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.कारण आता ग्रामसभेला स्वतंत्र असा संविधानिक दर्जा प्राप्त झाला आहे. १९९३ पर्यंत म्हणजे ७३ वी घटना दुरुस्ती होईपर्यंतच्या कालखंडात ग्रामसभा आमंत्रीत करणे हे ग्रामपंचायतीसाठी ऐच्छीक स्वरुपाचे कार्य होते. ग्रामसभेला फारसे अधिकारही नव्हते पंचायत राज योजना सुरु झाल्यानंतर ३५ वर्षे उलटून गेली तरीही खेडयांचा म्हणावा तसा विकास झाला नाही. याच्या अनेक कारणापैकी एक कारण ग्रामसभांना व्यापक स्वरुपाचे अधिकार न देणे होय. हे राष्ट्रीय नेते आणि राजकिय विचारवंताच्या लक्षात आले.

आधुनिक तिर्थक्षेत्र म्हणून गौरविल्या गेलेल्या हिवरे बाजाराने जागरुक व सतर्क ग्रामसभा असल्यास गावात आर्थिक क्रांतीबरोबरच सामाजिक क्रांती घडू शकते, असा संदेश दिला आहे. काही वर्षापुर्वी या गावातील लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत होते. ग्रामसभेच्या माध्यमातून जलसंधारण, वनिकरण, कुऱ्हाड बंदिचे महत्व ग्रामस्थांच्या मनावर बिंबवून या गावाने कात टाकली. या घटनेमुळे ग्रामसभेचे महत्व अधोरेखांकित झाले.

आजच्या काळातील प्रतिनिधिक शासन पध्दतीच्या अथवा अप्रत्यक्ष लोकशाहीच्या युगात ग्रामसभा म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीचा अभिनव प्रयोग होय आणि तेही भौगोलीक व लोकसंख्यात्मक दृष्टया विशाल आकार असणाऱ्या भारतात या शब्दात ग्रामसभेचे वेगळेपण वर्णन करता येईल, या दृष्टीने ग्रामसभा प्रत्यक्ष लोकशाहीला प्रत्यक्षात अमलांत आणल्याला हेतुने महत्वपुर्ण आहे.

अशा महत्त्वपुर्ण ग्रामसभेमध्ये ग्रामविकासाचा आराखडा तयार करुन अमलात आणण्याच्या दृष्टीने निर्णय घेतले जातात १९९३ ला घटनात्मक स्थान मिळाल्यानंतर पुढील काळात ग्रामसभेविषयी शासनाने वेळोवेळी ग्रामसभा घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ते बदल केले आहे.

**ग्रामसभेचे कायदे विषयक स्थान :-**

महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायत अधिनियम - १९५८ च्या कायद्यानुसार ग्रामपंचायतीतंर्गत प्रत्यक्ष लोकशाही अमलात आणण्याच्या उद्देशाने ग्रामसभा घेण्यासाठी मान्यता देण्यात आली. परंतु १९५८ ते १९९२ पर्यंत प्रत्येक ग्रामपंचायत आपआपल्या मर्जीने ग्रामसभेचे आयोजन करत असत, म्हणजेच ग्रामपंचायतीनां ग्रामसभा आयोजीत करणे अनिवार्य नसल्यामुळे बऱ्याच ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा होतच नव्हत्या आणि ज्याठिकाणी त्या व्हायच्या त्या ठिकाणी त्या सभेचे तेवढे गांभीर्य नव्हते. त्यामुळे भारतीय संविधानातच ग्रामसभेला स्थान देण्यात आले.

संविधानामध्ये १९९२ मध्ये ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार कलम - २४३ (अ) अंतर्गत ग्रामसभेचा विशेष उल्लेख करण्यात आला व अशा पध्दतीने ग्रामसभेला संविधानिक दर्जा किंवा स्थान प्राप्त झाले व ग्रामसभेच्या बैठका घेणे ग्रामपंचायतींना अनिवार्य करण्यात आले.

ग्रामसभेच्या बैठकीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने सन २००० मध्ये महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम (ब) अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९८५ कलम ७ (१) मध्ये दुरस्ती करुन प्रत्येक वित्तीय वर्षी चार सभा घेण्यात येतील अशी तरतुद केली होती. पुढे २००३ मध्ये २००३ महाराष्ट्र अधिनियम क्र.३ कलम ३ अन्वये वरील कलमात पुन्हा दुरुस्ती करुन प्रत्येक वित्तीय वर्षी ग्रामसभेच्या सहा सभा घेण्यात येतील अशी तरतुद केली आहे. त्यापुढील कालावधीमध्ये -

| | | |
|---|---|---|
| पहीली सभा | - | एप्रिल / मे |
| दुसरी सभा | - | १५ ऑगष्ट |
| तीसरी सभा | - | ऑक्टोंबर |
| चौथी सभा | - | २६ जानेवारी |
| पाचवी सभा | - | ग्रामपंचायतीच्या सोईनुसार |
| सहावी सभा | - | ग्रामपंचायतीच्या सोईनुसार |

या शिवाय सर्वसाधारण ग्रामसभेच्या पहील्या दिवशी महिलांची ग्रामसभा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच दोन ग्रामसभामध्ये ३ महिन्यापेक्षा जास्त अंतर नसावे महीलांच्या सभेमध्ये घेण्यात आलेले ठराव दुसऱ्या दिवसाच्या ग्रामसभेत जसेच्या तसे पारीत करण्यात यावे असेही निश्चित करण्यात आले. एक ग्रामसभा दलीत वस्तीत घेण्यासही आग्रह करण्यात आला.

**ग्रामसभेचे महत्व :-**

ग्रामिण भागामध्ये नागरिकांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे गावातील पुढारी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेक शासकिय योजनाचा फायदा घेण्यासाठी सुविधा देत नसत. परंतु ग्रामसभेला घटनात्मक स्थान प्राप्त झाल्यापासून ग्रामपंचायतीला महत्वाचे सर्व निर्णय ग्रामसभेत पारीत करुन घेणे अनिवार्य केले आहे. म्हणजे आता गावाच्या विकासाचे निर्णय ग्रामसभेत होणार आहे.त्यामध्ये विकास योजनाच्या अंदाजपत्रक तयार करणे त्यास मान्यता देण्यावरोबरच जवाहर रोजगार योजना, संजय गांधी योजना, इंदीरा आवास योजना, समाज कल्याण खात्याच्या विविध योजनांचे लाभार्थी (लाभधारक) निवडण्याचे अधिकार ग्रामसभेला मिळाले आहेत. यशवंत ग्रामसमृध्दी सारख्या योजनामुळे गावांचा विकास करण्यासाठी कोणत्या विकास योजना आखायच्या याचे अधिकारही ग्रामसभेत मिळाले आहेत. गावातील किंवा गावाच्या परीसरातील दारुची दुकाने बंद करण्याबाबतचे अधिकारही शासनाने ग्रामसभांना दिले आहेत. त्यामुळे सहाजिकच ग्रामसभाचे महत्व वाढलेले आहे.

**महीला ग्रामसभा :-**

ग्रामसभेमध्ये सदस्य या नात्याने महिला हया ग्रामसभेच्या घटक आहेत. त्यांच्या उपस्थिती आणि सहभागाशिवाय ग्रामसभा उचित कार्य करु शकणार नाहीत. ग्रामसभेच्या नियमित सभांना उपस्थित राहून महिलांनी निर्णय घेण्याचा आपला हक्क बजावला पाहीजे त्यासाठी त्यांनी प्रवृत्त व्हावे याची विशेष व्यवस्था नव्या दुरुस्तीने केली आहे.

महाराष्ट्र शासनाने गावाच्या विकासासाठी आणि गावाच्या विकास कार्यक्रमात महिलांचा सहभाग असावा म्हणून महिलांसाठी स्वतंत्र ग्रामसभा घेणे कायद्याने बंधनकारक केले आहे. महिला ग्रामसभेला जरी हजर असल्या तरी पुरुषांपुढे बोलण्यास तसेच आपली मते मोकळेपणे न मांडण्यामागे त्यांच्यावर मानसिक दबाव असतो. त्यामुळे

महिलांची स्वतंत्र ग्रामसभा घेऊन त्यांना खुली चर्चा करुन त्यांचे प्रश्न किंवा समस्या मांडल्या पाहिजेत व त्याप्रमाणे त्यांच्या हिताचे व सोईस्कर निर्णय त्यांना घेता आले पाहिजेत या उद्देशाने महिला ग्रामसभांना अतिशय महत्त्व आहे. अशारितीने महीला ग्रामसभामध्ये महिलांनी मांडलेले विचार, प्रस्ताव ग्रामसभेमध्ये विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच महिला ग्रामसभा प्रत्येक ग्रामसभेपुर्वी घेणे पोट कलम ५ नुसार बंधनकारक करण्यात आले आहे.

**ग्रामसभेत महिलांचा सहभाग :-**

पंचायतराज व्यवस्थेमध्ये ग्रामसभा गावातील सर्व मतदारांचा राजकिय प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविण्यासाठी व नागरिकांच्या विकास प्रक्रियेत स्वतःच सहभागी होण्यासाठी आयोजीत करण्याचे ठरले आहे. त्याप्रमाणे गावातील सर्व नागरिक ग्रामसभेत सहभागी व्हावेत ही अपेक्षा असते.परंतु भारताचा इतिहास पाहता आतापर्यंत ग्रामसभेत केवळ पुरुषांचाच सहभाग असतो. याचा अर्थ असा होत नाही की, महिला ग्रामसभेत सहभागी होत नाही. परंतु महिलांच्या सहभागा संदर्भात २००८-०९ ला केंद्रिय ग्रामविकास मंत्रालयाने केलेल्या सर्वे मध्ये पदाधिकारी महिलांचे ग्रामसभेतील सहभागाचे प्रमाण केवळ २५% पर्यंतच असते असे निदर्शनास आले आहे.

महिलांचा सहभाग वाढावा यासाठी १९९३ ला आरक्षण देऊनही पाहीजे तसा प्रभाव न पडल्यामुळे आजही केंद्र सरकार वा राज्यसरकार महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशिल असते. त्यादृष्टीने आज काही ठिकाणी महिला पंचायतराज व्यवस्थेमध्ये त्या अंतर्गत ग्रामसभेमध्ये सहभागी होण्याचे प्रमाण वाढत आहे, परंतु तरीही महिलांचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता आहेच. या दृष्टीकोनातुन चिखली तालुक्यात ग्रामसभेत महिलांच्या सहभागाचे प्रमाण वाढत आहे. परंतु तरीही महिलांचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता आहेच. याच दृष्टीकोनातुन चिखली तालुक्यात ग्रामसभेत महिलांच्या सहभागाचे प्रमाण किती आहे व ज्या महिला सहभागी होतात त्यांचा सहभाग सक्रिय आहे का ? अशा विविध प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाकडून चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग एक सर्वेक्षण अशा पध्दतीचा विषय घेऊन राज्यशास्त्र विषयाचे विद्यार्थी शिक्षक यांनी हे सर्वेक्षण केले. त्याविषयाचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**उद्दिष्टे :-**

१. चिखली तालुक्यातील ग्रामपंचायतीतील ग्रामसभेच्या नियमितते विषयी जाणून घेणे.

२. ग्रामसभेत महिलांचा सहभाग किती व कसा असतो ? याची माहिती मिळविणे.

३. ग्रामसभेत पदाधिकारी महिलांचा सहभाग किती व कसा असतो ? जाणुन घेणे.

४. पदाधिकारी महिलांचे अधिकार पुरुष नातेवाईक वापरतात का ? माहिती मिळविणे.

**गृहितके :-**

१. चिखली तालुक्यातील गावांमध्ये ग्रामसभा नियमित होत नाही.

२. ग्रामसभेमध्ये महिलांची उपस्थित अत्यल्प असून सक्रिय सहभाग नसतो.

३. ग्रामसभेत पदाधिकारी महिला सहभागी होतात परंतु तो सहभाग सक्रिय नसतो

४. ग्रामसभेत पदाधिकारी महिलांचे अधिकार पुरुष नातेवाईक वापरतात.

**सर्वेक्षणाचे महत्व :-**

आज २१ व्या शतकामध्ये कार्पोरेट क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. तसेच आज असे कोणतेच क्षेत्र नाही की, ज्या मध्ये महिला सहभागी नाहीत. हे वास्तव आपणाला केवळ शहरी भागांत आढळून येते. परंतु आजही पंचायतराज व्यवस्था तथा ग्रामिण विकासाशी निगडीत क्षेत्रात महिलांचा सहभाग अथवा शिक्षणाचे प्रमाण खुप कमी असल्याचे सरकारच्या अनेक अहवालामध्ये दिसते. त्याच अनुषंगाने सरकारने महिलांसाठी पंचायतराज व्यवस्थेत ५०% आरक्षणाची व्यवस्था केली परंतु तरीही महिलांचे प्रश्न सुटतांना दिसत नाहीत. त्यामुळे त्याचे काय कारण आहे? त्याचा आढावा घेण्यासाठी व शासनाला अथवा भावी नागरीकांना (विद्यार्थी) महिला सक्षमिकरणासाठी हे सर्वेक्षण उपयोगी पडणार आहे. त्या दृष्टीने या सर्वेक्षणाचे अनन्य साधारण महत्व आहे

**तथ्य संकलन :-**

'चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग'जाणून घेण्यासाठी प्राथमिक स्त्रोतांचा वापर करण्यात आला. गैर संभाव्य नमुना निवड पध्दतीचा वापर करुन त्यानुसार आपले महाविद्यालयातील १० खेडयातील विद्यार्थ्यां असणाऱ्या १० खेडयाची निवड करण्यात आली. व त्या विद्यार्थ्यांकडे एका ग्रामपंचायतीमधून १० या प्रमाणे १०० प्रश्नावली देऊन ग्रामसभेत सहभागी होणाऱ्या व पदाधिकारी महिलांकडून भरुन घेण्यात आल्या.

अशा प्रकारे प्राप्त तथ्यांच्या आधारे सादरीकरण करुन माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

**व्याप्ती व मर्यादा :-**

पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढत आहे. त्यासाठी शासनाची अनेक धोरणे कारणीभूत ठरली आहेत. महिला सक्षमिकरणाच्या दृष्टीने ही बाब नक्कीच गौरवपुर्ण आहे. परंतु तरीही पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या सहभागाचे प्रमाण अत्यल्पच असल्याचे अनेक ठिकाणी आढळुन येते. त्यातील सत्यता जाणुन घेण्यासाठी आपण 'चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग' हा विषय घेऊन सर्वेक्षण केले आहे. पंचायतराज मध्ये महिलांचा सहभाग हा विषय खुप व्यापक आहे. परंतु आपणाला वेळ व इतर मर्यादा लक्षात घेता पुर्ण भारताचा अथवा महाराष्ट्राचा अभ्यासकरणे शक्य नाही. तरीही त्या प्रश्नाची प्रतिनिधीक सत्यता जाणून घेण्यासाठी चिखली तालुका निश्चित केला व त्यातील ही १० ग्रामपंचायतीच निवडल्या आहेत. थोडक्यात सर्वेक्षणाची व्याप्ती चिखली तालुक्यातील १० ग्रामपंचायतीच आहे. तसेच या सर्वेक्षणासाठी अनेक मर्यादा आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सर्वेक्षण करणारे विद्यार्थी केवळ पदविचेच आहेत. ज्यांना सर्वेक्षणाचे पूर्ण ज्ञान नव्हते, महाविद्यालयाचे विद्यार्थी ज्या गावात होते त्याच ग्रामपंचायतीची निवड केली असल्यामुळे इतर विद्यार्थ्यांना त्या ग्रामपंचायतीने घेतलेल्या ग्रामसभेत सहभागी होता आले नाही. अशा विविध मर्यादा आहेत

**सर्वेक्षणाचे विश्लेपन :-**

ग्रामसभेमध्ये महिलांची उपस्थिती असते का? व त्याचे प्रमाण किती? व त्याचे अधिकार त्या स्वतः वापरतात का? अशा विविध प्रश्नाची उत्तरे प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राप्त करण्याचा प्रयत्न या सर्वेक्षणात केला आहे. त्यामध्ये महिलांनी काय उत्तरे दिली आहेत ते पूढील विश्लेषणाच्या आधारे पाहता येतात.

१. **आपल्या गावात ग्रामसभा होतात का ?**

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | ७१ |
| २. | नाही | ०३ |
| ३. | कधी कधी | २६ |

वरिल उत्तरामध्ये ७१% महिलांनी ग्रामसभा नियमित होतात, ०३% महिलांनी नाही व २६% महिलांनी कधी कधी होतात असे सांगितले आहे. यावरुन आपण असे म्हणू शकतो की, चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत ग्रामसभा जवळपास नियमित होतात.

२. **ग्रामसभा होत असल्यास त्यामध्ये महिलांचा सहभाग असतो काय ?**

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | २९ |
| २. | नाही | ५८ |
| ३. | कधी कधी | १३ |

वरिल प्रकारचा प्रश्न विचारला असता महिलांचा ग्रामसभेत सहभाग असतो असे केवळ २९% महिला सांगतात व नाही ५८% महिला सांगतात आणि कधी कधी केवळ १३% महिला सांगतात म्हणजेच यावरुन आपण असे म्हणू शकतो की, चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत महिलांच्या सहभागाचे प्रमाण अत्यल्प आहे. एकिकडे महाराष्ट्रामध्ये पंचायतराज व्यवस्थेत महिलांसाठी ५०% आरक्षणाची तरतुद केली आणि महिलांचां सहभाग त्या तुलनेत खुप कमी आहे असे निदर्शनास येते.

३. **ग्रामसभेत महिला सहभागी होत असतील तर त्यांच्या उपस्थितीचे प्रमाण किती आहे ?**

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | २५%पर्यंत | ७२% |
| २. | ५०% पर्यंत | २३% |
| ३. | ७५% पर्यंत | ०५% |
| ४. | १००% | ००% |

वरील तक्त्यानुसार ग्रामसभेत महिलांच्या उपस्थितीचे प्रमाण केवळ २५% पर्यंतच असते असे ७२% महिलांनी सांगीतले तर अनुक्रमे ७५% पर्यंत व १००% पर्यंत ०५% व ००% आहे म्हणजेच ग्रामसभेत महिलांच्या उपस्थिती बाबत खुप वाईट अवस्था असल्याचे आढळुन येते केवळ २५% पर्यंतच महिलांची उपस्थिती असे ग्रामविकासात महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने वाईट अवस्था आहे असे म्हणता येईल.

४. **ग्रामसभेत महिलांचा सहभाग सक्रीय असतो का ?**

| अ.क्र | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | १९% |
| २. | नाही | ७७% |
| ३. | वेळ प्रसंगी सक्रीय असतात | ०४% |

वरील तक्त्यामध्ये ग्रामसभेत महिलांचा सहभाग सक्रीय असतो सांगणाऱ्या महिला केवळ १९% आहेत, नाही सांगणाऱ्या ७७% तर वेळेनुसार सक्रीय सांगणाऱ्या केवळ ०४% महिला आहेत. यावरुन चिखली तालुक्यातील ग्रामपंचायतीने आयोजीत ग्रामसभेत महिलांचा सहभाग अगोदर पहिल्याप्रमाणे अत्यल्प तर आहेच आणि ज्या सहभागी होतात. त्यांची सक्रीयता सुध्दा खुप कमी असल्याचे निदर्शनास येते. ही महिला सक्षमिकरणाच्या दृष्टीने वाईट बाब आहे.

५. **ग्रामसभेत महिलांनी मांडलेल्या प्रश्नांची दखल घेतली जाते का ?**

| अ.क्र | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | ४७% |
| २. | नाही | ४५% |
| ३. | कमी वेळा | ०८% |

ग्रामसभेत महिलांनी मांडलेल्या प्रश्नांची दखल ४७% महिलांच्या मते घेतली जाते तर ४५% महिलांच्या मते दखल घेतली जात नाही. कमी वेळा ८% महिलां सांगतात. यावरुन पुरुषांच्या बरोबरीने महिलांना स्थान मिळतांना दिसत नाही. जर समान स्थान मिळाले असते तर महिलांना १००% दखल घेतात असे वाटले असते. वरील माहिती नुसार तसे होत नाही.

६. **ग्रामसभेत होणाऱ्या एखाद्या ठरावाला महिलां भविष्यकालिन धोके लक्षात घेऊन ठामपणे विरोध करतात का?**

| अ.क्र | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | १२% |
| २. | नाही | ८८% |

वरील तक्त्यातील माहितीनुसार महिलां ग्रामसभेत काही ठरावांना विरोध करत नाही असे दिसते उदा:- दारु दुकानाला परवानगी देणारा ठराव असेल तर अशा वेळेस महिलांचा विरोध असु शकतो परंतु तो ठराव त्या ठामपणे मांडत नसतील तर आज महिलांच्या सक्षमीकरणाची अपेक्षा व समान वागणूकीची अपेक्षा फोल ठरते. म्हणजे महिलां ग्रामसभेत सक्षमपणे आपली बाजु मांडण्यास कमी पडतात व त्यामुळे त्यांना स्वकल्पनेतुन ग्रामविकास करण्यास अडथळे निर्माण होतात.

७. **ग्रामसभेत ग्रामपंचायत पदाधिकारी महिला उपस्थित असतात का ?**

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | ५७% |
| २. | नाही | ४३% |

ग्रामसभेत पदाधिकारी महिलांची १००% उपस्थिती आवश्यक असते. तरीही आपणाला वरील तक्त्यामध्ये केवळ ५७% महिलांना वाटते की महिला पदाधिकारी ग्रामसभेला हजर असतात. त्यामुळे ही स्थिती दयनिय असल्याचे दिसून येते.

८. **असल्यास पदाधिकारी महिलांच्या उपस्थितीचे प्रमाण किती असते ?**

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | २५% पर्यंत | २०% |
| २. | ५०% पर्यंत | ५३% |
| ३. | ७५% पर्यंत | २१% |
| ४. | १००% पर्यंत | ०९% |

वरील तक्त्यात ग्रामसभेत महिलांच्या उपस्थितीच्या प्रमाणाविषयी महिलांना दिलेली उत्तरे आहेत. आणि त्यामध्ये ५३% महिलांनी सांगीतले ग्रामसभेत पदाधिकारी महिलांच्या उपस्थितीचे प्रमाण केवळ ५०% आहे यावरुन असे म्हणता येते की, पंचायतराज व्यवस्थेत महिलांना ५०% आरक्षण असल्यामुळे काही महिला केवळ आरक्षणामुळे पदावर येतात परंतु ग्रामपंचायत च्या उपक्रमात पूर्णपणे सहभागी होत नाहीत तर त्यांच्या अधिकाराचा वापर घरातील पुरुषांकडून होतांना दिसतो.

९. **ग्रामसभेत पदाधिकारी महिलांचे अधिकार त्या स्वतः वापरतात का ?**

| अ.क्र | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | होय | ३६ |
| २. | नाही | ४९ |
| ३. | कधी कधी | १५ |

वरील तक्त्यामध्ये पदाधिकारी महिलांचे अधिकार त्या स्वतः वापरतात का असा प्रश्न विचारला असता फक्त ३६% महिलांनी स्वतः अधिकार वापरतात असे म्हटले आहे. तर नाही सर्वाधिक म्हणजे ४९% महिलांना वाटते व कधी कधी वापरतात असे केवळ १५% महिलांना वाटते म्हणजे शासनाने ५०% आरक्षणाची व्यवस्था करुनही महिला अजुन स्वतः अधिकार वापरत नाही किंवा वापरुन दिले जात नाही. हे महिला सक्षमिकरण तथा ग्रामविकासाच्या दृष्टीने हे चिंताजनक आहे.

१०. **पदाधिकारी महिलांचे अधिकार पुरुष नातेवाईक वापरतात ?**

| अ.क्र | उत्तर | % |
|---|---|---|
| ०१. | होय | ५९% |
| ०२. | नाही | ४१% |

अगोदरच्या प्रश्नामध्येच पाहिले की पदाधिकारी महिला आपले स्वत:चे अधिकार खुप कमी महिला वापरतात. आणि वरील तक्त्यात पदाधिकारी महिलांचे अधिकार पुरुष नातेवाईक वापरतात. असे ५९% महिलांना वाटते. म्हणजे आजही महिला पदावर केवळ नामधारी असल्याचे आढळून येतात. ही बाब ग्रमाविकास तथा महिला सक्षमिकरणासाठी घातक असल्याचे जाणवते.

११. **पदाधिकारी महिलांचे अधिकार पुरुष नातेवाईक किती प्रमाणात वापरतात ?**

| अ.क्र. | उत्तर | % |
|---|---|---|
| १. | २५% पर्यत | १८% |
| २. | ५०% पर्यंत | २१% |
| ३. | ७५% पर्यंत | ५२% |
| ४. | १००% पर्यंत | १९% |

वरील तक्त्यात पदाधिकारी महिलांचा अधिकार वापराचे प्रमाण ७५% पुरुष नातेवाईक वापरतात असे सर्वाधिक ५२% महिलांनी सांगीतले म्हणजे महिलांचे अधिकारआजही त्यांना स्वायत्त पध्दतीने वापरु दिले जात नाही. ग्रामविकासामध्ये महिलांना दिलेल्या अधिकाराचे हनन होतांना दिसत आहे. त्यामुळे महिला सक्षमपणे ग्राम समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कमी पडत आहे ही बाब आपणासाठी चिंतनीय आहे.

अशा प्रकारे सर्वेक्षणाच्या माध्यमातून चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग कसा होता? सहभाग साधारण सक्रीय आहे का ? अश्या विविध प्रश्नाची उत्तरे महिलांकडून जाणून घेतली व त्याचे विश्लेषण करण्यात आले. त्या आधारावर पुढील निष्कर्ष निघाले आहेत.

**निष्कर्ष व उपाययोजना -**

ग्रामसभेत महिलांच्या सहभागा विषयी जाणुन घेण्यासाठी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने चिखली तालुक्यातील १० ग्रामपंचायती निश्चित करुन प्रत्येकी १० महिलांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आल्या. त्या प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले व ठरविलेल्या उद्दीष्टाला अनुरुप पुढील निष्कर्ष निदर्शनास आहेत.

**निष्कर्ष :-**

१. चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत नियमित ग्रामसभा होतात असे निदर्शनास आले.

२. ग्रामसभांमध्ये महिलांचा सहभाग खुप कमी असल्याचे निदर्शनास येते.

३. ग्रामसभेमध्ये सहभागी महिला सक्रीय नसतात असे निदर्शनास आले.

४. ग्रामसभेत महिलांनी मांडलेल्या प्रश्नांची फार गंभीरतेने दखल घेतली जात नसल्याचे दिसते.

५. ग्रामासभेत पदाधिकारी महिलांच्या उपस्थितीचे प्रमाण खुप कमी राहते.

६. पदाधिकारी महिलांचे अधिकार त्या स्वत: कमी व पुरुष नातेवाईक जास्त प्रमाणात वापरत असल्याचे निदर्शनास आले.

चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग एक सर्वेक्षण केले त्यातुन जे निष्कर्ष हाती आले ते वरील प्रमाणे आहेत.

**उपाययोजना :-**

पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी व ग्रामविकास होण्याच्या दृष्टीने भारतात १९९३ ला ७३ वी घटनादुरुस्ती करुन महिलांसाठी ३३% आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली.परंतु तरीही महिलांचा सक्रीय सहभाग वाढू शकला नाही हे भारताचे दुर्दैव आहे. म्हणजेच महिलांना आरक्षणामुळे पदे मिळाले परंतु अधिकार नाही. ही स्थिती कमी करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये मे २०१० मध्ये शासनाने हे आरक्षण ३३% वरुन ५०% केले. परंतु आज नऊ वर्षांनी आपण अभ्यास केला तर पुन्हा महिला पदाधिकारी झाल्या परंतु अधिकार मात्र पुरुष नातेवाईकाकडूनच वापरले जातात. असे वरील निष्कर्षामध्ये आढळुन आले. त्यासाठी पुढील प्रकारच्या उपाययोजना सुचविता येतात.

१. ग्रामसभेमध्ये महिलांची ५०% उपस्थिती अनिवार्य करावी.

२. महिलांनी मांडलेल्या प्रश्नांना प्रथम प्राध्यान्य देण्यात यावे.

३. पदाधिकारी महिलांना १००% उपस्थिती अनिवार्य करावी.

४. ग्रामसभेत सुत्रे पूर्ण महिलांकडे असावीत.

५. ग्रामसभेत छायाचित्रण अनिवार्य करावे.

६. महिला ग्रामसभा यशस्वी राबवाव्या.

**सारांश :-**

अशाप्रकारे चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग एक सर्वेक्षण त्याची उद्दीष्टे, गृहितके व प्राप्त माहितीच्या आधारे विश्लेषण,विश्लेषणाच्या आधारे निष्कर्ष व उपाययोजना वरील प्रमाणे मांडता आले. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनाची आवड निर्माण व्हावी व त्यांना संशोधन क्षेत्रातील पध्दतीचा अभ्यास व्हावा तसेच सामाजिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणिव विद्यार्थ्यांना व्हावी आणि त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्यामध्ये संशोधक व चिकित्सक वृत्ती विकसीत व्हावी या उद्देशाने आम्ही चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग या विषयावर सर्वेक्षण केले आहे. त्यामध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये होणाऱ्या ग्रामसभेत ज्या महिलांनी सहभाग नोंदविला त्यांच्याकडून परिशिष्ट मध्ये दिलेल्या प्रश्नावली भरुन घेण्यात आल्या. त्या प्राप्त १०० प्रश्नावलीचे सारणीकरण करुन त्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. त्यातुन चिखली तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत होणाऱ्या ग्रामसभेत महिलांचा सहभाग असतो परंतु तो कमी असून पदाधिकारी महिलांच्या सहभागाचे प्रमाणही कमी आहे. तसेच पदाधिकारी महिलांच्या अधिकाराचा वापर बऱ्याच ठिकाणी पुरुष नातेवाईकामार्फत होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

*****